गृह (परिवहन) विभागातील मोटार वाहन निरीक्षकांच्या सर्वसाधारण बदल्या (सन २०१८)....

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन आदेश क्रमांकः एमव्हीडी-०३१८/प्र.क्र.१०१/परि-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: ०९ मे, २०१८

शासन आदेश:-

सार्वजनिक सेवेच्या हितार्थ महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील तरतूदीनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने खालील तक्त्यात नमूद मोटार वाहन निरिक्षक या संवर्गातील अधिकाऱ्यांची प्रशासकीय कारणास्तव त्यांच्या नावासमोर स्तंभ क्रमांक ४ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र	अधिकाऱ्यांचे नांव	सध्याची पदस्थापना	बदलीनंतरची पदस्थापना
१	२	३	४
१	श्री.प्रदिप शेजवळ	मुंबई (प)	मुंबई (मध्य)
२	श्री. दिपक ठाकरे	मुंबई (पू)	मुंबई (प)
३	श्री. अशोक जाधव	हिंगोली	उमरगा
४	श्री. सचिन झाडबुके	परभणी	जालना
५	श्री.शेख मो.गौस चाँदपाशा	लातूर	नांदेड
६	श्री. सुनिल पायघन	अकोला	नांदेड
७	श्री. प्रमोद घाटोळ	वाशिम	नांदेड
८	श्री. मंगेश इंगळे	नागपूर (शहर)	नांदेड
९	श्री.मेघल अनासने	यवतमाळ	नांदेड
१०	श्री.वसंत कलंबरकर	नांदेड	हिंगोली
११	श्री.सचिन बंग	नांदेड	लातूर
१२	श्री.हितेश दावडा	नांदेड	अमरावती
१३	श्री.प्रशांत ताकसांडे	अमरावती	यवतमाळ
१४	श्री.राहूल जाधव	अमरावती	यवतमाळ
१५	श्री.कैलास भरकाडे	बुलढाणा	वाशिम
१६	श्री. प्रविण कपुरिया	भंडारा	नागपूर (ग्रामीण)
१७	श्रीमती मोनिका राठोड	नागपूर (पुर्व)	नागपूर (शहर)
१८	श्री.संजय माने	नागपूर (ग्रामीण)	अहमदनगर
१९	श्री.नितीन उके	नागपूर (शहर)	नागपूर (पूर्व)
२०	श्री. प्रशांत चिंचोळकर	भंडारा	वर्धा
२१	श्री. संजयकुमार पेंढारकर	नागपूर (शहर)	नागपूर (ग्रामीण)
२२	श्री. मोहन बोर्डे	वर्धा	भंडारा

२. सदर अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन पदाचा पदभार त्वरित स्विकारावा. तसेच त्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये. त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक - सीडीआर १०८२/ २५६७/ २८/ अकरा, दि.३० ऑगस्ट, १९९२ च्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सूचना लक्षात घेऊन बदली रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

३. संबंधीत नियंत्रक अधिकाऱ्यांनी बदली करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांस त्यांच्या सध्याच्या पदभारातून तात्काळ कार्यमुक्त करुन, त्यांना नवीन नेमणूकीच्या जागी तातडीने रुजू होण्यास सांगावे. तसेच या आदेशाची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याकरीता बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही परिस्थितीत दिनांक १ जुलै २०१८ पासूनचे वेतन बदलीपूर्व कार्यालयाने काढू नये. याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत नियंत्रक अधिकाऱ्याची असेल.

४. संबंधीत अधिकाऱ्यांनी नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी विहित कालावधीत रुजू व्हावे व पदभार स्विकारल्याचा अहवाल परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत शासनास सादर करावा.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०९१५५७३७१३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arjun Sampat Waghmode

Digitally signed by Arjun Sampat Waghmode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa36f850da37bfbe62486d2bab04146cb40b5662724fae653d0947d157f6450, serialNumber=ae0e4de46520602899a22015dac4a9cedaae6d43ca3fcb9262b2280e43ecfce7, cn=Arjun Sampat Waghmode
Date: 2018.05.09 18:02:28 +05'30'

(अर्जुन सं. वाघमोडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.मंत्री/राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १ / २, मुंबई/नागपूर
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
८) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व जिल्हे)
९) प्रादेशिक परिवहन अधिकारी (सर्व)
१०) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी (सर्व)
११) सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी (सर्व)
१२) संबंधित मोटार वाहन निरिक्षक
१३) निवड नस्ती (परि-३).